# प्रभुतरुण

| वर्ष ४७ | अंक १२ | मुंबई | जून २०१३ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)* **तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**


*संपादकीय*

## वुई आर ऑन!

**—सुहासिनी कीर्तिकर**

**कृतज्ञ स्मरण**



**विहंग नायक**

उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या ऋतूंबरोबरच आपले आणखी कितीतरी ऋतू असतात. ऋतू शब्द जऽऽरा जड जातोय का? ठीकाय्! आपण आपलं त्याला 'मौसम' म्हणूया. म्हंजे जसं की लग्नाचा मौसम. फिरत्या 'पिकनिकां'चा मौसम. परीक्षांचा मौसम. 'रिझल्टां'चा मौसम. आपल्या रोजच्या जगण्यात उत्कंठा अन् आनंद वाढविणारे असे अनेक मौसम आपण साजरे करतो. त्याचंही स्वत:चं असं व्यक्तिमत्व असतं. स्वत:चा 'माहोल' असतो. तर मंडळी; सध्या 'रिझल्टां'चा 'ऋतू बरवा' नांदतोय!

आम्ही आमच्या काळात अनुभवलेला हा ऋतू (पक्षी: मौसम) फार फार वेगळा होता. आम्ही म्हंजे आमच्या पिढीनं. त्याकाळी 'इंटरनेट' कुठलं हो? नेटानं 'इंटरनली' संपर्क साधून 'रिझल्ट' समजून घ्यायचे. हां! फक्त स्वत:चाच 'रिझल्ट' नव्हे बरं का. किंबहुना तुम्ही किंवा तुमच्या सख्ख्या नात्यातील कुणी घरचा परीक्षेला बसला असो वा नसो; निकालाच्या या मोसमात तुमच्या घरचं कॅलेंडर अनेक नावांनी अन् नंबरांनी गिचमीड गिचमीड भरून गेलेलं असायचं. कुणीही ओळखीचं, शेजारपाजारचं, नात्यामधलं किंवा 'बहिणीच्या नणंदेच्या पुतण्याचा' त्यांच्या घरी येणारा शेजारी मित्र असो; 'ट्रेन'मधील रोजचा सहप्रवासी... त्याचा मुलगा किंवा मुलगी असो; त्या सर्वांचे (परीक्षार्थींचे) सीटनंबर्स अगत्यानं विचारून घ्यायचे; कॅलेंडरवर टिपून ठेवायचे. मग विशेषत: 'मॅट्रिक' सारखी मोठी परीक्षा असली तर किंवा मग 'इंटर'ची परीक्षा असली तर वर्तमानपत्रवाले चंगळच करायचे. त्या सुहान्या, सार्वजनिक एकात्मकतेच्या काळी वर्तमानपत्रात निकाल सर्व परीक्षाक्रमांकासह छापून यायचे. पानंच्या पानं भरून! त्याकाळी वर्तमानपत्राची चार पानं भरतील इतकेच विद्यार्थी असायचे हो. मला आठवतंय्, माझा मॅट्रिकच्या परीक्षेचा नंबर फक्त एकशे चौतीस होता. आडनाव आगासकर, म्हणून 'अ'च्या बाराखडीमुळं अगदी जवळचा; फक्त 'एकशे'त बसणारा! आज असे सगळे नंबर्स जर छापायचे म्हटले तर वर्षभराचे रकाने त्या वर्तमानपत्राला पुरायचे नाहीत! असो. पहिल्या पानावर कोणत्या शाळेचा विद्यार्थी /विद्यार्थिनी पहिला/ पहिली आलाय, कोणत्या शाळेनं जास्तीतजास्त झेंडे फडकवून बाजी मारलीय, टक्केवारी काय आहे... याची बातमी स्वत:च्याच तोंडात रिझल्टचे पेढे असल्यासारखी झळकायची. आतल्या पानावर फक्त नंबर्स. प्रथम वर्ग, द्वितीय वर्ग, तृतीय वर्ग अशा प्रतवारीने छापलेले. कॅलेंडरवर टिपलेले नंबर्स पाहता यावेत लवकर लवकर; म्हणून दादर, गिरगावसारख्या परिसरात पेपर विकणारी पोरं रात्री बारापासूनच रस्त्यांवर उतरायची. 'बालमोहनचा मुलगा पहिला...!' किंवा 'चिकित्सकची मुलगी पहिली... मॅट्रिकचा निकाल साठ टक्के...' वगैरे ओरडत जाहिरात करत पेपर फडकवत हिंडायची. हातोहात पेपर्स खपायचे. एकदा पेपर हाती पडला की जवळ असलेल्या सगळ्या नंबर्सची कुंडली मांडली जायची. 'अरे वा! बेबीताईंचा मुलगा फर्स्टक्लासमध्ये बरं का!' 'बाबलीबायची नात पास झाली हं!' अशा आनंदी प्रतिक्रियांनी घरोघरी रात्र उमलत जायची. हो! तेव्हाच्या काळी 'क्लास' मिळणे ही मोठी कमाई मानली जायची. 'फर्स्ट क्लास वुईथ डिस्टिंक्शन' म्हणजे पोरगं एकदम

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## मराठी असे आमुची मायबोली

**-मिनाक्षी जयकर**

फेब्रुवारी महिना सुरू झाला की जसे परीक्षांचे वारे वाहू लागतात; त्याचबरोबर यंदा सुट्टीत कुठे जायचे याविषयीच्या चर्चांनाही उधाण येते. यावर्षी आमच्या घरी ही चर्चा मात्र फक्त मी आणि माझ्या नवऱ्यातच होत होती. मुलगा दहावीला होता. तेव्हा त्याच्या अभ्यासात व्यत्यय नको म्हणून आम्हीच दोन-तीन ठिकाणं निवडली आणि नंतर त्याला विचारलं. दहावीचं वर्ष म्हटलं की पूर्वीपासूनच त्याचा एक बागुलबुवा(?) उभा केलेला आहे. ''अरे बापरे! दहावीला का!!'' अशीच सर्वसाधारण प्रतिक्रिया असते. सद्यपरिस्थितीतले दहावीच्या बाबतीतले मतप्रवाह बाजूला ठेवले तरी दहावीच्या वर्षाचं विद्यार्थ्यांच्या आयुष्यातलं स्थान वादातीत आहे. त्याच्या शैक्षणिक आयुष्यातील तो एक महत्त्वाचा टप्पा आहे. घरातला मुलगा किंवा मुलगी दहावीला गेला/गेली की आपोआप सर्व घराचंच वेळापत्रक त्याच्या किंवा तिच्या शाळेच्या आणि क्लासच्या वेळपत्रकाप्रमाणे ठरते. आमचंही घर याला अपवाद नव्हतं. अगदी माझी धाकटी मुलगीही जिचा याच्यात प्रत्यक्ष सहभाग काहीही नव्हता तरी, अतिशय कंटाळली होती. ''कधी संपणार दादाची परीक्षा? दादा मला हल्ली भेटतच नाही. जेव्हा बघावं तेव्हा तो घरीच नसतो.'' अशी तिची तक्रार होती. त्यामुळे गेल्या वर्षा-दीड वर्षाचा शारीरिक आणि मानसिक थकवा घालविण्यासाठी छोटीशी का होईना, पण एक कौटुंबिक सुट्टी फार गरजेची होती. कुठे जातो यापेक्षा ही सुट्टी एकत्र व्यतीत करणं हे जास्त महत्त्वाचं होतं. या पार्श्वभूमीवर आमची केरळ सहल ठरली आणि आतापर्यंत केवळ टी.व्ही.वर नाहीतर चित्रात पाहिलेलं निसर्गरम्य केरळ 'अजि म्या याचि देही याचि डोळा' पाहिलं! केरळला देवभूमी का म्हणतात याची प्रचिती आली. महिन्यातून दोनदातरी पाऊस पडत असल्यामुळे इथे सर्वत्र बारा महिने हिरवेगार असते. सर्व डोंगर उंच-उंच अशा हिरव्यागार झाडांनी बहरलेले; नाहीतर चहाच्या मळ्याच्या गालिच्यांनी आच्छादलेले. आणि त्या अप्रतिम नैसर्गिक बॅक वॉटरचा उल्लेख केल्याशिवाय केरळची ओळख पूर्णच होऊ शकत नाही.

आणखी एक. इतर दाक्षिणात्य राज्यांप्रमाणे इथेही एक गोष्ट मला प्रकर्षाने जाणवली. ती म्हणजे 'प्रादेशिक भाषेचा' वापर! लहान-थोर, सर्व वयोगटातील लोक इथे फक्त मल्याळम्मध्येच एकमेकांशी संवाद साधत होते. शहरी भागातले काही अपवाद वगळता सर्व पाट्या, अगदी पथदर्शक पाट्यासुद्धा मल्याळम्मध्येच होत्या. ज्याला मल्याळी भाषा येत नाही अशा माणसासाठी तिथे रस्ता शोधणे ही कसोटीच ठरेल. ठिकठिकाणी, अगदी रेल्वेतही विशी-पंचविशीची मुले मल्याळी वृत्तपत्र विकत घेऊन वाचताना दिसत होती. या संपूर्ण प्रवासात हिंदी चित्रपटसंगीत चुकूनही कानावर पडलं नाही की वाटेत लागलेल्या चित्रपटगृहात हिंदी सिनेमा झळकलेला पाहिला नाही.

कर्मधर्मसंयोगाने मुंबईत परतल्याच्या दुसऱ्याच दिवशी एका परिसंवादाला उपस्थित राहण्याचा योग आला. परिसंवादाचा विषय होता, ''पंचवीस वर्षांनंतर मराठी!'' सद्यस्थितीत मराठी टिकविण्यासाठी काय उपाय योजता येतील यावर उहापोह झाला. अशावेळी केरळ आणि महाराष्ट्रातला विरोधाभास अगदी ठळकपणे जाणवला. राज्याचे पुढील पंचवीस वर्षांचे मराठी भाषेविषयी धोरण कसे असावे, यासाठी राज्यशासनाने हा परिसंवाद आयोजित केला होता. अनेक मान्यवरांनी त्या परिसंवादात आपली मते मांडली. वानगीदाखल एकदोन मुद्दे इथे सांगते- विद्यापीठात मराठीसाठी भाषाभवन उभारणे, शासकीय पातळीवर रोजच्या व्यवहारात मराठीचा वापर वाढविणे. पण हे झाले सामाजिक पातळीवरचे उपाय. मला असे वाटते घरच्या घरीही आपण मराठीचा वापर वाढवू शकतो.

(पान २ कॉलम ३ वर)

(पान१ कॉलम २ वरून)

हुशारच! डिस्टिंक्शन म्हणजे पंच्याहत्तरच्या वर गुणकमाई. मग ‘शाम्याला तीन विषयात डिस्टिंक्शन बरं का!’ याचंच कौतुक. इंटर आर्टस्सारख्या परीक्षेत सेकंड क्लास मिळणं म्हणजे आभाळाला हात! इतक्या विद्यार्थ्यात इंटरला सेकंड क्लासमध्ये जेमतेम पंचवीस-सत्तावीस नंबर्स झळकायचे. फर्स्ट क्लास विचारायलाच नको.

हे असे ऐन रात्रीतून पेपर्समधून हाती लागलेले रिझल्टस् समजले की मग नंतरच्या आठ दिवसात अनेक विजयी वीरांकडून पेढेवाटप सुरू व्हायचं. प्रत्येकाच्या घरी जाऊन, वडील मंडळींच्या पाया पडून, त्यांचे आशीर्वाद घेऊन पेढे दिले जायचे. म्हणून हा मौसम सुरू होण्याआधीच या यशस्वी वीरांना देण्यासाठी भेटवस्तूंची बेगमी घरोघरी केली जायची. अगदी साडी, शर्टपीस, दप्तर, खेळ, पेन्सपासून सगळी व्हरायटी त्यात असायची. त्या वस्तू देताना खराखुरा आनंद असायचा. म्हणूनच त्याबरोबर दिला जाणारा आशीर्वादही मनभरून असायचा. अगदी जवळचा कुणी ‘यशस्वी’ असेल तर त्याच्या किंवा तिच्या घरी पॉटच्या आईस्क्रिमची मोठ्ठी पार्टी! सवाष्णींना मदनबाणाच्या वेण्या; नाहीतर मोगऱ्याचे गजरे. मात्र पार्टी कुठल्याही हॉटेलात नाही हं! किती घरगुती वातावरणात परीक्षेचं यश घवघवीत होत साजरं होई!

असं सगळं साजरं झालं की मऽऽग हव्या असणाऱ्या कॉलेजमध्ये ॲडमिशन. बरोबर घरातलं कुणीतरी मोठं माणूस असायचंच. इथे ॲडमिशन मिळेल का?, तिथे पहाटेपासून रांग लावायला लागेल का?, प्रवेशअर्जांची पंधरा दिवस आधी खरेदीसाठी झुंबड, कुणाकुणाची ओळख ॲडमिशन मिशन बनवून काढ... अशा झमेल्यात कुणीच फारसा अडकायचा नाही. म्हंजे कसं असायचं ना; की गंगेच्या प्रवाहात सोडलेला दिव्याचा द्रोण अलगद वाहत वाहत पलीकडच्या तीराला पोहोचावा इतक्या सहजपणे पहिलीत (‘केजी’त नाहीच) दाखल केलेला आपला पाल्य सहजपणं डिग्रीच्या तीरावर उतरायचा. क्लासचे प्रस्थ नव्हतेच अजिबात. गंमत म्हणजे अगदीच ‘ढ’ मुलांसाठी त्याकाळी क्लासेस असायचे. क्लासला जाणं म्हणजे अप्रतिष्ठाच मानली जाई. अभ्यासाची ‘गाईडस्’ ही काही थोड्या मुलांकडे ‘श्रीमंतीचं दुखणं’ म्हणून दाखल व्हायची. शाळा-कॉलेजची वेळ संपली की खेळ, नाटकं, वाचन, गप्पा, उनाडक्या... करायला सगळ्यांना मुभा असे. मला आठवतंय, एक पेंडसे नावाचा माझा हुशार विद्यार्थी होता. त्याला ‘एसएससी’ला एक्याऐंशी टक्के गुण होते. तो कॉलेजमध्ये दाखल झाल्यावर ‘युवामंच’मध्ये त्याची मी मुलाखत घेतली. त्यानं सहजपणं काय सांगावं? त्या (महत्त्वाच्या) वर्षी त्याने वर्षभरात पंच्याहत्तर सिनेमे पाहिले होते. आमचे डॉ. गं. ना. जोगळेकरही एम.ए.ला पुणे विद्यापीठातून सुवर्णपदक विजेते होते. पण परीक्षेच्या पेपरच्या आदल्या दिवशी त्यांनी ‘प्रभात’चा चित्रपट पाहिला होता. हो! म्हंजे ‘हा चित्रपट राहिला बुवा’ अशी मनाला रूखरूख लागून परीक्षेत एकाग्रता ढळायला नको! श्री. सुहास लिमयेही परीक्षेचा पेपर लिहिता लिहिता शेजारच्या बिल्डिंगमधून ऐकू येणाऱ्या गाण्यानं भान हरपून गाणं ऐकत राहिले होते. गाणे संपल्यावर पुन्हा पेपर लिहिणं चालू... तरीही ‘जगन्नाथ शंकरशेट’ त्यांनी मिळविली! अभ्यासाची वाघनखं घालून सिद्ध असायलाच हवं; पण ती सततच घालून कशाला भटकायचं? कधी पानफुलं, कधी मोरपीसही हातात हवंच ना? कोणताही ताण न घेता, स्पर्धा न करता व्हायचा तेव्हा अभ्यास; अन् पुढचं शिक्षणही भविष्याच्या अनेक वाटा फुटलेलं नव्हतं तेव्हा. अर्ध्या अर्ध्या गुणासाठी चढाई नव्हतीच तेव्हा.

अन् आज? काही चार, पाच दशकांमध्ये चित्र केव्हढं बदलून गेलंय. रॅटरेस! ‘केजी’पासून ‘पीजी’पर्यंत प्रचंड भागदौड. पुढच्या करियरवर लक्ष ठेवून अवघ्या तिसऱ्या-चौथ्या वर्षापासून घोडे फक्त पळवायचे. शिस्तीच्या नावाखाली अनेक बंधनं. अमूक वाजता उठा, अमूक वाजता क्लासला पळा. अमूक वाजता अभ्यासाला बसा. आठवडी परीक्षेला आकांतानं अभ्यास करून बसा. सणवार नाही. मौजमजा नाही. परीक्षा जवळ आली की टीव्ही नाही, मित्रमैत्रिणी-नातेवाईक यांना घरी बोलवायचं नाही. पालकांनी रजा काढून घरी बसायचं, मुलामुलींनं ‘रिक्रेएशन’ म्हणून काय करायचं ते ठरवायचं. नव्वद टक्के गुण मिळाले तरी नापासाचं दुःख भोगायचं. पुढच्या ॲडमिशनसाठी भागम्भाग करायची. सुट्ट्यांमध्येसुद्धा अभ्यासाच्या-क्लासच्या दोरखंडांनी बांधलेल्या हद्दीतच फिरत राहायचं. पैसा-पैसा ओतायचा अन् नंतर तोच परत मिळविण्यासाठी समीकरणं जुळवायची भविष्यात. ‘कराग्रे वसते लक्ष्मी’ लक्षात घेऊन सरस्वतीला ‘करमध्ये’ बंद मुठीतच दुसऱ्या स्थानावर ठेवायचं. मग डोळ्यावर ढापणं चढतात, डोक्याला टक्कल पडतं, पाठीचं दुखणं सुरू होतं, मेंदू बधीर होतो, मन आमरण मरत जातं, भावनांना घट्टे पडतात, ‘मी’वरचढ ठरतो... पण त्यात खऱ्या अर्थानं ‘मीपण’ उरतच नाही. आज असं बरंच काही वाळवी लागल्यासारखं चित्र आहे. यशाचा आनंदही एकत्रित साजरा करण्याचं बळ उरलं नाही. वेळ उरला नाही. ‘नेट’वर बातमी टाकली की संपलं सारं! ‘फेस टू फेस’ न करता ‘फेसबुक’वर आलं की संपलं!

खरंच सारं संपलंय का? मला नाही वाटत तसं. चित्र बदललं असलं तरी आजच्या चित्रातले रंग वेगळे आहेत. ‘फ्लुरोसंट’ रंग आमच्यावेळी नव्हतेच मुळी. आज ते आहेत. निवडाल त्या करियरच्या वाटेवर अगदी गगनाला हात भिडेपर्यंत जाता येईल इतक्या विविध वाटा आज समोर पसरलेल्या आहेत. त्या इतक्या गुळगुळीत आहेत की त्यावर चालताना वेगातच पळावं लागतं. ‘थांबला तो संपला’ अशी परिस्थिती आहे. वेग वाढवायचा तर पूर्वी मान्य असलेल्या अनेक ‘सन्मान्य’ सुखांना अंतरावं लागतं. त्याला इलाज नाही. मुख्य म्हंजे आजच्या पिढीला ‘स्वयंमार्गदर्शक’ बनता येतंय. तांत्रिक साधनं उपलब्ध आहेत. चांगल्या कारणासाठी ‘पैशाची थैली’ मोकळी करायला लागली तर तशी सुदैवानं परिस्थिती आहे, इच्छा आहे. घरटी एक किंवा दोनच मुलं असल्यानं शिक्षणासाठी ‘सर्व काही’ करायची उमंग आहे, सुबत्ता आहे. एका एका गुणासाठी सिद्ध करताना स्वयंसिद्धता वाढते आहे. म्हणूनच आजच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचं कौतुक वाटतंय.

हा परीक्षांच्या ‘रिझल्ट’चा मौसम आहे. या मौसमात आनंदनिधान बनलेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचं मनापासून अभिनंदन. हल्ली एक जाहिरात टीव्हीवर वारंवार येते पहा. (त्यालाही सल्लूनं वीस कोटी घेतले म्हणतात. आता आमिर एक जाहिरात करणार आहे या वर्षात. त्यासाठी त्याने अठ्ठ्याऐंशी कोटी घेतलेत. बघा, म्हंजे जाहिरातीच्या वाटेनंही भविष्यात आजची पिढी वळते आहे ते चांगले की नाही? आमच्यावेळी जाहिरात असलीच तर एखादी ‘मर्फी बेबी’ची असायची बापडी. नाहीतर ‘सासरा पळाला’ वाटणारी ‘सार्सापरिला’ची) तर जाहिरात आहे शीतपेयाची.त्यात तो म्हणतो, ‘बघा, तुमच्यातही एक तुफान दडलंय. फक्त त्यावरचं बूच काढा.’ तसं विद्यार्थीमित्रहो, तुमच्यातही एक कर्तृत्वाचं तुफान बूच निघण्याची वाट बघतंय. भविष्यात फक्त त्यावरचं बूच तेवढं काढा.अन् म्हणा, ‘वुई आर ऑन! होऊन जाऊ द्या.’

(पान१ कॉलम ४ वरून)

आपल्या मुलांशी कटाक्षाने मराठीत बोलण्याचे धोरण ठेवू शकतो, जेणे करून त्यांना मराठी ऐकण्या-बोलण्याची सवय राहील. एवढे केले तरी एकसंध महाराष्ट्र-मराठी बोलीच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले असे समजू; नाही का?

## पाठारे प्रभु सोशल समाज

❁ पाठारे प्रभु सोशल समाजातर्फे आषाढी एकादशीनिमित्त अभंगयात्रा शनिवार दिनांक २० जुलै २०१३ रोजी दुपारी ४ वाजता व्यंकटेश मंदिर, ठाकुरद्वार येथे आयोजित केली आहे. तरी सर्वांनी त्याचा अवश्य लाभ घ्यावा, असे कार्यकारी समितीतर्फे कळविण्यात येत आहे. इच्छुक गायकांनी अधिक माहितीसाठी चिटणीसांकडे संपर्क साधावा.

❁ पाठारे प्रभु सोशल समाजाची एक दिवसीय वर्षासहल रविवार दिनांक २८ जुलै २०१३ रोजी सभासदांसाठी आयोजित केली आहे. अधिक माहितीसाठी सं. चिटणीसांकडे संपर्क साधावा- सौ. नीता सेंजित- ९८२०१६६६२८ व श्री. जयंत कीर्तिकर- ९८६७९५८५३५

❁ पाठारे प्रभु सोशल समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा आणि नवीन समिती व एका विश्वस्ताची निवडणूक रविवार दिनांक २५ ऑगस्ट २०१३ रोजी प्रभु सेमिनरी शाळा सभागृह, भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार, मुंबई-४००००२ येथे दुपारी ४ वाजता घेण्यात येईल. सर्व सभासदांनी उपस्थित राहावे.

सभेपुढील कामकाज

१) सूचना परिपत्रकाचे वाचन.

२) समाजाच्या रविवार दि. ५ ऑगस्ट २०१२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेची टिपणे वाचून मंजूर करणे.

३) समाजाचा १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१३ चा कार्यवृत्तांत अहवाल वाचून मंजूर करणे.

४) समाजाच्या कार्यकारिणीचा १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१३ सालाचा जमाखर्चाचा ताळेबंद सादर करणे व मंजूर करून घेणे.

५) नवीन कार्यकारी समितीची आणि विश्वस्त पदाची निवडणूक घेणे आणि निकाल जाहीर करणे.

६) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळेचे कामकाज.

विशेष सूचना-

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास तीच सभा, त्याच ठिकाणी, त्याच दिवशी आधी ठरलेल्या वेळेच्या अर्ध्या तासानंतर (म्हणजे ४.३० वाजता) घेण्यात येईल. त्यावेळी गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

(पान ४ कॉलम ३ वर)

## पाठारे प्रभु महिला समाज

मंगळवार दिनांक २३ एप्रिल २०१३ रोजी चैत्रातील वासंतिक हळदीकुंकू समारंभ साजरा करण्यात आला. त्यादिवशी काव्यस्पर्धा व निबंधस्पर्धा घेण्यात आल्या. त्यांचा निकाल पुढीलप्रमाणे-

काव्यस्पर्धा कै. सुहासिनी कृष्णराव वाझकर स्मरणार्थ व श्रीमती उषा शिवराज कोठारे पुरस्कृत. विषयः तुझ्याविना (काव्य घरून लिहून आणणे.) प्रथम क्रमांकः- सौ. सुजाता रामनाथ कोठारे, द्वितीय क्रमांकः- सौ. विजयश्री आनंदकुमार नवलकर, तृतीय क्रमांकः- सौ. रजनी नितीन कोठारे.

निबंधस्पर्धा- महिलांसाठी. कै. मालतीबाई रामराव कीर्तिकर स्मरणार्थ , कै. श्रीमती सुप्रिया सुरेंद्र वैद्य स्मरणार्थ,कै. सौ. निहारिका विलास कोठारे स्मरणार्थ व कै. श्रीमती लक्ष्मीबाई माधव प्रभाकर स्मरणार्थ. विषयः- स्पर्धांचे युग (घरून लिहून आणणे). प्रथम क्रमांकः- श्रीमती सुरूपा राणे देवरूखकर, द्वितीय क्रमांक (विभागून):- कुमारी शलाका निलेश विजयकर व सौ. मीना धराधर आंबवणे. तृतीय क्रमांकः- सौ. रजनी नितीन

(पान ३ कॉलम ४ वर)

लेखांक-६

## फुलता नलिनी दल

# उद्धवा, अजब तुझे सरकार!

— नलिनी तळपदे

‘‘आजकाल आपलं दर्शनही दुर्मीळ झालंय हं चिऊताई. कुठे होतीस गं इतके दिवस? आज अशी अचानक कशी काय आठवण झाली आमची?’’

‘‘अरे, आम्ही मैत्रिणी यात्रा कंपनीबरोबर गेलो होतो एका.’’

‘‘मग कशी काय झाली सहल?’’

‘‘सहल छान झाली. पण इथे आल्यावर प्रॉब्लेम झालाय मोठ्ठा.’’

‘‘कसला?’’

‘‘आणखी कसला? जागेचा.’’

‘‘का- तुझं घर मेणाचं आहे ना छानसं- तेही वडिलोपार्जित?’’

‘‘होना. पण आता येऊन पाहते तर घरच गायब. ज्या झाडावर ते बांधलं होतं ते झाडच कुणीतरी मुळासकट उपटून टाकलंय.’’

‘‘अरे व्वा. ही तर चक्क दंडुकेशाही झाली. कुणाला न सांगतासवरता बेघर करणं हा कायद्याच्या दृष्टीनं गुन्हा आहे.’’

‘‘या राज्यात कायदा पाळतं कोण? उघडउघड कायदा गाढव आहे असं म्हणून त्यातून पळवाट काढून बेकायदा कामं चाललेली असतात. तरी ‘ह्यांना’ जाताना घराकडे लक्ष ठेवायला बजावून गेले होते. पण ‘हे’ कसले, गेले असतील चित्तमपल्लींच्या भाषणाला.ह्यांच्या भरवशावर यात्रेला गेले. माझंच चुकलं.’’

‘‘अगं हो हो. आता चिमणराव कुठे आहेत?’’

‘‘मला भेटतील तर मी सांगेन ना. हे चित्तमपल्ली म्हणजेऽऽ’’

‘‘आता वड्याचं तेल वाग्यांवर का काढतेस उगाच? हे मारुतराव चित्तमपल्ली, सलीम अली आपले मित्र आहेत चांगले. पक्षीमित्र. सलीमअली आता नाहीत. पण या दोघांनाही आपल्या पक्ष्यांबद्दल प्रेम आणि आपुलकी वाटते. माणसं माणसांवर करत नाहीत इतकं प्रेम ते प्राणीमात्रांवर विशेषत: पक्ष्यांवर करतात.’’

‘‘हा कसला बाई छंद?’’

‘‘हा छंद त्यांचा परमानंद आहे चिमणे. बरं ते जाऊ दे . तुझं सांग. तू काय करणार आहेस आता?’’

‘‘फिरतेय घराच्या शोधात. बऱ्याच इमारती दिसताहेत आसपास. बांधकामंही जोरात चालू आहेत त्यातलंच एखादं घर बघून त्याच्या वळचणीला राहीन म्हणते.’’

‘‘ए बाई, शहाणी असशील तर कोणत्याही घराच्या वाटेला जाऊ नकोस. त्यापेक्षा एखाद्या झाडाच्या शेंड्यावर घरटं बांध. मोकळा श्वास तरी घेशील.’’

‘‘खरं सांगू, मी ही अशी एकटी. पिल्लांना पंख फुटल्यावर त्यांनी घेतली गगनभरारी. आणि आमचे छांदिष्ट, फिरताहेत पायाला चक्र लावल्यासारखे गावोगाव. त्यामुळे एकटीसाठी हा व्याप करण्यापेक्षा एखाद्या घराच्या वळचणीला आरामात पडून रहावंसं वाटतं आणि तसंही इतकी वर्षे मेणाच्या घरात राहिल्यामुळे काडीकाडी जमवून घरटं बांधायला मी शिकले नाही, आणि या वयात मला ते जमणारही नाही.’’

‘‘माझं ऐक चिऊ. माझी बालमैत्रीण म्हणवतेस आणि मला परका समजून माझ्या घरट्यात चार दिवस रहायला संकोच करतेस?’’

‘‘अरे पण...’’

‘‘कळलं. आपलं सगळं बोलणं ऐकलंय ‘तिनं’. तिनंच तर सुचवलं मला. अंहं. आता पण नाही न् परंतु नाही. वणवण करून दमली असशील. चार घास खाऊन निवांत झोप.आपण या विषयावर उद्या बोलू.’’

‘‘थारा नाही घरात अशी वाऱ्यावरची वरात असतांना मला झोप कशी येईल निवांत? त्यापेक्षा बाहेर मोकळ्या हवेत फांदीवर बसून गप्पा मारूया आपण. चांदणं टिपूर पडलंय, हवेत गारवाही छान आहे.’’

‘‘म्हणून म्हणतो, हे सगळं अनुभवायला इथेच घरटं बांध चांगलंसं झाड बघून.’’

‘‘तरी पण घराचा आसरा का नको हा प्रश्न अनुत्तरीतच राहिला.’’

‘‘सांगतो ना. अगं आजकाल माणसांसारखीच घरंही बेभरवशाची झाली आहेत. केव्हा कोसळून पडतील त्याचा नेम नाही.’’

‘‘त्यात घरांचा काय दोष? बांधकाम कच्च असलं की घरं कोसळणारच.’’

‘‘तेच तर. या इमारतींचं कच्चं बांधकाम करणारी माणसं मात्र पक्की निर्ढावलेली असतात. प्रत्येक ठिकाणी खाबूगिरी हे एकच त्यांचं ध्येय आणि धोरण असतं. शिवाय हे काम कुणा एकाचं नसतं. त्यात खालपासून वरच्या स्तरापर्यंत अनेकांचे हात गुंतलेले असतात.’’

‘‘पण लोकांनी का हे सहन करावं?’’

‘‘जळात राहून माशाशी वैर साधता येईल का चिमणे?’’

‘‘ही कसली लोकशाही, ही तर बेबंदशाही.’’

‘‘हो ना. राज्यकर्त्यांचं बेबंद, बेधुंद, बेताल वागणं बोलणं जनतेला कळत का नाही? म्हणून तर त्यांच्याविषयीच्या अनादर, अविश्वास, असंतोषाचा उद्रेक होऊन संप, मोर्चा, आंदोलनातून त्यांच्याविषयीची नाराजी व्यक्त केली जाते.’’

‘‘आधी बांधकामं करायची आणि नंतर ती पाडून टाकायची यात किती पैसा, वेळ, मजुरांचे श्रम वाया जातात हे लक्षात येत नाही का त्यांच्या?’’

‘‘चिऊताई, केवळ पैसा हेच ‘लक्ष्य’ असणाऱ्यांच्या लक्षात या गोष्टी कशा येतील? आधी कायदा धाब्यावर बसवून अधिकृत परवाने संमती द्यायची आणि कायद्याचा बडगा उगारल्यावर त्या इमारतीची अनधिकृत म्हणून फोडतोड करायची. काही इमारती तर बिचाऱ्या आपण फसवले गेलो आहोत या भावनेनं आपल्या आपण मुळासकट कोसळून ढासळून पडतात आणि त्याखाली बिचारी माणसं चिरडली, भरडली जातात. त्यांना त्याचं कसलं आलंय सोयरसुतक...’’

‘‘निर्दयी मेले. जनतेच्या जीवावर मजा मारून त्यांच्याच जीवाशी खेळ करतात. आधी कायदा धुडकावून बेकायदा बांधलेल्या इमारतींना अधिकृतपणाचे परवाने द्यायचे आणि कायद्याचा बडगा उगारल्यावर अनधिकृत म्हणून त्या इमारती पाडतांना आपण त्या वास्तूचा म्हणजेच एकपरीनं वास्तूदेवतेचा अपमान करतो आहोत हे त्यांच्या गावीही नसतं. आधी घाव घालून जखम करायची, नंतर मदतीच्या रुपानं मलमपट्टी करायची.’’

‘‘हो ना. त्या शीळफाट्याला...’’

‘‘नको बाई. नुसतं शीळफाटा म्हटलं तरी अंगावर काटा येतो. डोक्यावर छप्पर तरी असावं या आशेनं आलेल्या माणसांना चक्क जमिनीत गाडलं त्यांनी. ती इमारत कुठे उभी होती माहीत आहे?’’

‘‘नाही बाई...’’

‘‘पाण्याचा प्रचंड दाब असलेल्या पाईप लाईनवर. हातचं घबाड जाऊ नये म्हणून पाईपलाईन बंद असल्याचं सांगून रहिवाश्यांच्या शंकेचे निरसन केलं गेलं. पण शेवटी व्हायचा तो अनर्थ झालाच. ती पाईपलाईन फुटून घरादारासकट किती जीवांचा नाहक बळी गेला.’’

‘‘त्याची हळहळ माणसांच्या सहवासात राहिल्यामुळे आपल्यासारख्या पक्ष्यांना, प्राण्यांना वाटते. पण या माणसांना आहे का त्याचं काही?’’

‘‘जाऊ दे ना. मी काव काव करून कितीही कंठशोष केला आणि तू पंख फडकवून चिवचिवाट केलास तरी परिस्थितीत बदल होणार नाही. जोपर्यंत आपल्या घरकुलाकडे कुणाची नजर जात नाही तोपर्यंत आपण सुरक्षित आहोत यातच समाधान मानायचं. तुझ्या मेणाच्या घराची खंत करू नकोस चिमणे. माझं शेणाचं घर नाही का वाहून गेलं पावसानं, पण मी घेतली ना उभारी? चल घे भरारी नव्या दमानं आणि बांध घरकुल छानसं!’’

*

(पान २ कॉलम ४ वरून)

कोठारे. मुलींसाठी- कै. रोहिणी चंद्रकांत विजयकर स्मरणार्थ. विषय:- फुलपाखरू. प्रथम क्रमांक:- कु. श्रिया कौशिक जयकर, द्वितीय क्रमांक:- कु. प्रणाली राकेश राणे.

काव्यस्पर्धा परीक्षण सौ. अपर्णा बेडेकर व निबंधस्पर्धा परीक्षण सौ. अंजली रमेश नवलकर ह्यांनी केले.

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# युवामंच

## मृदुलाची मैत्रीण

**-उज्ज्वला आगासकर**

(भ्रमणध्वनी: ९३२०५०९३४०/९३७१३८६९२५)

( डॉ. सत्त्वशीला सामंत ही मृदुला प्रभुराम जोशी यांची 'सख्खी' मैत्रीण. तिच्याबद्दल त्यांनी 'लोकप्रभा'मध्ये मृत्यूलेख लिहिला. सत्त्वशीलावर त्या लेखाशेजारीच दिलीप प्रभावळकरांचाही लेख आहे. 'प्रभुतरुण'च्या गेल्या अंकात मी सत्त्वशीलाला श्रद्धांजली वाहिलेली वाचनात आल्यावर आपल्या लेखाची कात्रणे माझ्याकडे संदर्भाकरिता मृदुलांनी पाठविली. सोबतच उज्ज्वला आगासकरांचा हा ताजा लेखही. मासिकातील एखाद्या वृत्तामुळं स्फूर्ती मिळून कसे अभिव्यक्त व्हावेसे वाटते याचा हा प्रत्यक्ष प्रत्ययच.

**-संपादक)**

दादरच्या किंग जॉर्ज हायस्कूलमध्ये शिकत असताना संस्कृतच्या गुप्तेबाईंनी शिकवलेला एक श्लोक असा होता. 'अजरामरवत्प्राज्ञो विद्यामर्थंच चिन्तयेत्। गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत्।।' अर्थात् विचारी व्यक्तीने विद्या व संपत्ती या गोष्टी कायम टिकणाऱ्या आहेत असे समजून त्या मिळवाव्यात, (मात्र) कोणत्याही क्षणी (आपल्या) शेंडीला पकडून मृत्यू आपल्याला खेचून नेऊ शकतो हे सतत लक्षात ठेवूनच रीतीने वागत राहावे. त्या लहान वयात या उक्तीमधले गांभीर्य नीटसे ध्यानात आले नव्हते. मात्र नंतरच्या आयुष्यामध्ये एकेक सुहृद जेव्हा अकस्मात गायब होऊ लागले तेव्हा प्रत्येकवेळी हटकून 'गृहीतइवकेशेषु'ची आठवण यायची आणि त्यातला अर्थ थाडकन् आपल्यावर आदळायचा.

माझी थोरली बहीण मृदुला ही तिच्या अभ्यासू वृत्तीमुळे शिक्षकवर्गाला जशी सतत प्रिय असायची तशीच तिच्या मनमिळाऊपणाने शाळेतल्या, कॉलेजमधल्या आणि नंतर तिच्या कार्यक्षेत्रामधल्या साहित्यिक मैत्रिणींनाही तिच्याशी चर्चा करणे महत्त्वाचे वाटत असे. अभ्यासाकडे काणाडोळा करून सतत उनाडक्या करणाऱ्या मृदुलाच्या धाकट्या बहिणीशी म्हणजे माझ्याशीदेखील तिच्या बहुतेक मैत्रिणींचे बऱ्यापैकी सख्य होते. यापैकीच एकीशी, म्हणजे सत्त्वशीलाशी जेव्हा माझ्या क्वचित भेटी होऊ लागल्या तेव्हा माझ्या स्वार्थाने हळूच डोके वर काढले. नाशिकचे स्व. डॉ. वि. म. गोगटे हे संस्कृततज्ञ असल्याने, विचित्र वाटणाऱ्या शब्दांच्या व्युत्पत्ती नेहमी पटकन् सांगत असत. मात्र ते गेल्यानंतर दुसऱ्या कुणाला मी कधी व्युत्पत्ती विचारायला गेले नाही. त्या सत्त्वशीलाला विचारता येतील का? हा मला लगेच प्रश्न पडला. मात्र मला स्वच्छ दिसत होते की ती भाषाविषयक वेगवेगळ्या व्यापांमध्ये गुरफटलेली होती, आगामी पुस्तकांची तयारी करीत होती. मोकळा वेळ असा तिला नव्हताच. त्यात कुठे या शंका विचारणार? पण जेव्हा हा विषय काढला तेव्हा तिने त्यातसुद्धा स्वारस्य दाखविले. मात्र जेव्हा तिच्या लक्षात आले की माझ्या शंकांचे शब्द संस्कृतखेरीज फारसी, अरबी, उर्दू मुळांचेदेखील असू शकतात तेव्हा तिने त्यासाठी एक पद्धत काढली. म्हणजे माझ्या शंका तिला विचारल्यावर ती हाताशी असलेल्या कागदावर त्या लिहून घेत असे; आणि नंतर वेगवेगळ्या भाषांचे संदर्भ तपासून स्पष्टीकरण नोंदवीत असे, त्यानंतर फोन करून मला सविस्तर अर्थाचे बारकावे आणि व्युत्पत्ती समजावून देत असे. असे कितीतरी शब्द मला तिच्यामुळे समजले आणि त्यातल्या काहींचे मूळ शोधताना तिलादेखील अभ्यासाचा आनंद मिळाला असे तीच सांगत असे. हा तिचा अभ्यास म्हणजे एक झपाटलेपणच असायचे! 'लोकप्रभा' साप्ताहिकासाठी तिने अशाच तऱ्हेची शब्दांची स्पष्टीकरणे देणारे सदर लिहावे असे मध्यंतरी ठरले. वर्षभरासाठी हे सदर लिहायचे असे ठरले, तेव्हा दर आठवड्याला एक लेख लिहून पूर्ण करावा असे अपेक्षित होते. गंमत म्हणजे सदरासाठी लेखन करायला तिने सुरुवात केली आणि झपाटल्यासारखे एकदोन नव्हे; चक्क पंचवीस लेख लिहून पूर्ण केले आणि 'लोकप्रभा'कडे पाठवून दिले! 'शब्दरंग' नावाच्या तिच्या या सदरामध्ये आतापर्यंत त्यातले पंधरासोळा लेख छापून झाले आहेत आणि त्याला अभ्यासू वाचकांचा उत्साहवर्धक प्रतिसाद लाभतो आहे.

समोर स्पष्ट दिसत असलेला कचरा उचलून फेकण्यात वेळकाढूपणा करणे हेसुद्धा सत्त्वशीलाला पटत नसे. कचरा एकत्र झालाच पाहिजे आणि लगेच तो नष्ट करून आवार स्वच्छ केलेच पाहिजे असा तिचा आग्रह असे आणि हे इतरांनी करावे असे तिने कधीच अपेक्षिले नाही. ती स्वत: यात उडी घेऊन धडपड करीत असे. नुकतीच तिच्या एका परिचित महिलेची सरकारदरबारी लटकलेली केस सुटावी यासाठी तिच्या चाललेल्या प्रयत्नांमध्ये 'हे प्रकरण शिवसेनेच्या आमदार डॉ. नीलमताई गोऱ्हे यांच्या कानावर घालशील का?' असे तिने विचारले होते. या कामी मला जरा उशीर होतो आहे असा समज झाल्यामुळे तिने सरळ तिचे म्हणणे पत्रात लिहून डॉ. गोऱ्हे यांच्याकडे पाठवून दिले आणि तसे मला कळविले. असे का? यावर तिचे उत्तर होते, 'विनाकारण अन्याय होत असलेल्या कोणत्याही महिलेच्या मदतीला धावून जाऊन अन्यायाचे यशस्वी निराकरण करणारी ही एकमेव व्यक्ती मला आज दिसते आहे,त्यामुळे त्यांच्या कानांवर मी हे घालणारच' पोस्टखात्याच्या कृपेने अद्याप हे पत्र डॉ. गोऱ्हे यांच्याकडे पोहोचलेले नाही!

'गृहीतइवकेशेषु'सारखे नियतीचे जे झटका देण्याचे कार्यक्रम असतात त्यात एकाच वेळी लाड करणे आणि लगेच कानशिलाखाली थप्पड मारणे असा एक विशेष खेळ असतो. परवाच्या महाराष्ट्र दिनाला मृदुलाला या खेळाचा सणसणीत अनुभव आला. 'प्रभुप्रभात'तर्फे दरवर्षी दिल्या जाणाऱ्या सन्मानांपैकी, साहित्यसेवेचा पुरस्कार म्हणून मृदुलाला सुवर्णपदक जाहीर झाले होते. ते १ मे रोजी तिला साहित्य संघ मंदिरात समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले. दुपारी ४ वाजता हा समारंभ आटोपून ती ६ वाजता घरी पोहोचली आणि ७ वाजता तिच्या कानशिलाखाली थप्पड बसली की सत्त्वशीला गेली. मृदुलाच्या आयुष्यात आजवर अनेक उलटसुलट प्रसंग तिने अनुभवले आहेत. पण तिला मुळापासून हादरवून टाकणारी ही 'घडामोड' आहे की 'उलथापालथ'...

...यावर आता सत्त्वशीलाचे मत कसे विचारणार?

*

---

(पान २ कॉलम ४ वरून)

२) समाजाचा अहवाल व जमाखर्चाचा ताळेबंद याविषयी ज्या सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी ते लेखी स्वरूपात समाजाचे सं. चिटणीस श्री. जयंत कोर्तिकर, चंद्रकला, ३रा मजला, डिलीव्हरी पोस्ट ऑफिससमोर, ७वा रस्ता, खार(प.) मुंबई ४०००५२ येथे गुरुवार दि. १५ ऑगस्ट २०१३ पर्यंत पाठवावेत.

३) निवडणूक अर्ज गुरुवार दि. १ ऑगस्ट २०१३ पासून दोन्ही सं. चिटणीसांकडे उपलब्ध होतील. हे निवडणूक अर्ज गुरुवार दि. १५ ऑगस्ट २०१३ पर्यंतच दोन्ही सं. चिटणीसांकडे स्वीकारले जातील.

---

### काव्यप्रतिक्रिया

### लेखकाची कृतज्ञता

हाती आलेला अंक मे महिन्याचा
अपुल्या प्रभुतरुणाचा
दृष्टीस पडला पत्रप्रपंच हा
नंदकुमार विजयकरांचा।।
लेखकांना सदैव असते
प्रतिक्रियांची आस
मनोकामना पुरविल्या अमुच्या
विजयकरांनी खास।।
हर लेखाची करून सुंदर
मार्मिक मीमांसा
खुसखुशीत हे पत्र जणू असे
लेखांचा आरसा।।
सर्व लेखकांतर्फे करिते
कृतज्ञता ही व्यक्त
'प्रतिक्रिया थांबवू नका देऊनी
ह्या पत्रापुरती फक्त'।।
करीत अशी मी नम्र विनंती
विजयकर हो तुम्हा
येईल स्फुर्ती तुमच्या पत्राने
खात्री आहे आम्हा।।

**-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

## पत्र-प्रतिक्रिया

आपल्या मे २०१३च्या अंकात प्रसिद्ध केलेले नवीन सदर हे आपल्या मासिकाचे लवकरच मोठे आकर्षण ठरू शकते.

आपल्या मेच्या अंकातील हसरी रेखा हे श्री. प्रदीप कोठारे ह्यांचे व्यंगचित्र मजेशीर होते. त्यासंबंधी त्यांचे अभिनंदन!

हा उपक्रम श्री. नंदकुमार कृ. विजयकर ह्यांनी आपणा सर्वांसाठी खुला केला; त्याबाबत त्यांचेही त्रिवार अभिनंदन!

माझ्यासारखे भरपूर वेळ असलेल्यांना लेखन व वाचन हा एक विरंगुळाच आहे. एरव्ही एखादा लेख आपल्या व इतर काही मासिकात / वार्षिकात छापून आला की, जवळची ओळखणारी मंडळी भेटल्यावर सदैव कौतुक करतातच. हा माझा नेहमीचा अनुभव आहे. मात्र पत्र-प्रतिक्रियेमध्ये श्री. नंदकुमारांनी माझ्या पाठीवर कौतुकाची थाप मारली ह्याचा आनंद मला सर्वात जास्त लाखमोलाचा वाटला. श्री. नंदकुमारांचे मी व्यक्तिश: आभार मानतो.

आपले नवीन सदर सतत चालू रहावे व वाचकांनी त्यास उस्फूर्त प्रतिसाद द्यावा याबाबत कुणाचेही दुमत रहाणार नाही हे मात्र नक्कीच!

आपला नम्र,
अजित मानकर

(पत्रप्रतिक्रिया हे सदर नाही. वाचकांनी लेखी प्रतिक्रिया दिल्या की नेहमीच त्याला प्रसिद्धी दिली जाते. आपल्यासारखे प्रतिक्रिया देणारे वाचक यापुढेही सतत लाभले तर त्याला आपण म्हणता त्याप्रमाणे 'सदरा'चा दर्जा लाभेल.

-संपादक)

लेखांक ६

# मनातलं

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

जून महिना म्हणजे एस.एस.सी. आणि दुसऱ्या काही परीक्षांच्या निकालाचा काळ. ह्याच काळात शाळा, कॉलेजं सुरू होतात. अगदी लहान मुलांचा शाळेत, एस.एस.सी., एच.एस.सी. उत्तीर्ण झालेल्यांच्या कॉलेजच्या पहिल्या वर्षात तसंच पदवीधारकांचा पदव्युत्तर शैक्षणिक वर्षात प्रवेश घ्यायचा काळ- म्हणजेच नाव घालण्याचा काळ. नावात काय आहे या प्रश्नाचं मी तरी असं उत्तर देईन की नावातच सगळं काही आहे. ह्या नावाला महत्त्व येतं ते जन्माच्या आधीपासूनच. बाळाच्या आईचं नाव कोणत्या हॉस्पिटलमध्ये घातलंय हा पहिला प्रश्न येतो नी बाळाच्या जन्मानंतर बारश्याला काय नाव ठेवलं इथपासून जन्माच्या प्रवासाला सुरुवात होते. 'नाव ठेवणं' हा अगदी सर्वांच्या आवडीचा प्रकार. कुणी मनात तर कुणी प्रकटपणे दुसऱ्यांना नावं ठेवतात. घराण्याचं नाव काढलं किंवा घराण्याचं नाव बुडवलं इतक्या साध्या सोप्या भाषेत दुसऱ्याच्या लौकिक जीवनाचं मूल्यमापन आपण करीतच असतो. जेव्हा एखाद्याचं चांगलं कर्तृत्व जगभर गाजतं तेव्हा कौतुकानं अमक्यातमक्याचं नाव गाजलं असं आपण म्हणतो. तर उलट अर्थानं 'नाव गाजवलं हं' असा उपरोधात्मक सूरही काढला जातो. कोणत्याही अर्थानं जेव्हा एखाद्याला खूप प्रसिद्धी मिळते तेव्हा त्या माणसाचं नाव घेताक्षणीच त्या व्यक्तीबद्दलचे सगळे संदर्भ एका क्षणात आपल्या डोळ्यांपुढे उभे राहतात. सचिन तेंडुलकर हा विक्रमवीर. पण त्याचे विक्रम वेगळे. शेक्सपियर म्हटलं की इंग्रजी भाषेतला थोर नाटककार, साहित्यिक ह्या संदर्भाचीच आठवण होते. पु. ल. देशपांडे म्हटलं की दर्जेदार विनोदाचा बादशहा हेच त्यांचं रूप आठवतं. समजा, शेक्सपियर किंवा पु. ल. देशपांडे यांना नावच नसतं तर? आपण त्यांची ओळख वेगवेगळी कशी ठेवली असती? कारण शेक्सपियरसारखे दुसरेही दर्जेदार साहित्यिक इंग्रजी भाषेचं नाव उजळून गेलेच की! प्र. के. अत्रे यांनीही विनोदी लेखन केलंच की! त्यांच्या 'झेंडूची फुले' ह्या कवितासंग्रहावरून हे सिद्धच होतं. तसंच त्यांच्या गंभीर नाटकांचा दर्जाही अप्रतिम होताच. पण मराठीत दुसरेही सिद्धहस्त नाटककार होऊन गेलेच ना? त्या प्रत्येकाची ओळख तात्काळ आपल्या मनात, त्यांच्या महतीच्या कारणांचे उभे आडवे धागे क्षणात स्वत:चा रंग, पोत दाखवत उभे राहतात. नावाने कोणत्याही चेहऱ्याला ओळख लाभते. हाच चेहरा लेखकाच्या लेखनाला, अभिनेत्याच्या अभिनयाला, गायकाच्या गायकीला, नाटककाराच्या नाटकांना, दिग्दर्शकाच्या दिग्दर्शनाला म्हणजेच कुठंतरी ह्या प्रत्येकाच्या स्वतंत्र शैलीला लाभतो. टी.व्ही.वर नुसता चेहरा बघून 'अरे, तो हा...' असं आपण म्हणतो तेव्हा त्याचं नाव आठवेपर्यंत आपल्या मनाची घालमेल होते.

आपण वस्तूंना किंवा कपड्यांना वेगवेगळ्या नावानी ओळखत नाही. पण विशेषनाम नसलं तरी सामान्यनाम असतंच नं. डायनिंग टेबल, ड्रेसिंग टेबल, रायटिंग टेबल, ही वर्गवारी होतेच ना? कपड्यांचे प्रकारसुद्धा शर्ट, साडी, पायजमा, पँट, फ्रॉक इत्यादी शब्दांनीच दर्शविले जातात.त्यातही कपड्यांच्या रंगानुसार, साड्यांच्या पोतानुसार नी प्रकारांनुसार ते ओळखले जातात. हे वेगवेगळे शब्दच महत्त्वाचे. नाव म्हणजेसुद्धा शब्दच.

मला खूपजण विचारतात की तुम्ही टोपण नावानं का लिहीत नाहीत? मी त्यांना विचारते की, मी टोपण नाव का घ्यायचे? तेसुद्धा एक नावच नं? तर मग चांगली प्रसिद्धी आपण आपल्या नावानंच का मिळवायची नाही? टोपणनाव प्रसिद्ध झालं तर असंही घडतं की प्रत्यक्ष त्या व्यक्तीची त्याच्या नावानं कुणी ओळख करून दिली तरी अमूक टोपण नावानं लिहिणारी तीच ही व्यक्ती हे आपल्याला माहीतच नसतं. मग नुसत्या हलक्या स्मितानं नी औपचारिक नमस्कारानं आपण भागवतो. पण तेच जर 'हे अमूक टोपण नावानं लिहितात' असं म्हटलं तर त्याच व्यक्तीला आदरानं अभिवादन केलं जातं.हे अभिवादन त्याच्या कलेला, लेखनाला असतं. पण नुसत्या शैलीवरून त्या व्यक्तीचं नाव ओळखणं कठीणच जातं. मग आपल्या शैलीला आपलं खरं नाव लाभलं तर उत्तमच ठरणार ना? म्हणजेच चेहरा, नाव, ओळख आणि आपली जी काही कला किंवा कर्तृत्व असेल ते हे सगळं आपल्या चाहत्यांनी एकत्रच लक्षात आणलं तर नकळत आपल्या व्यक्तिमत्त्वालाच एक स्वतंत्र ओळख, एक शैली लाभते. उदा. 'टाटा' हे नाव उच्चारलं की ह्या नावानं प्रसिद्ध असलेलं प्रचंड औद्योगिक क्षेत्र आणि ह्या कर्तृत्वाचा आताचा चेहरा, जो 'रतन टाटा' ह्या नावानं ओळखला जातो,तो त्याच्या कर्तृत्वासकट, त्याच्या प्रचंड सुयशासकट नी त्याच्या अफाट कीर्तिसकट डोळ्यांसमोर उभा राहतो.

नाव किंवा टोपण नाव हे दोन्ही शब्दच. नामदर्शक जो शब्द असतो त्याचा अर्थ लगेचच विचारला जातो. असं म्हणतात की, कवी कुसुमाग्रजांच्या समोर सगळे शब्द हात जोडून उभे राहत आणि आम्हाला घ्या किंवा आम्हाला तुमच्या लेखनात स्थान द्या असं म्हणत. केशवसुत म्हणत, 'शब्दांनो मागुते या' म्हणजे शब्दांना ते आवाहन करीत की मी जिथं जाईन तिथं तुम्ही माझी साथ द्या. प्रत्येक लेखकाला, कवीला विचारलं जातं की, 'तुम्हाला सुचतं कसं?' मलासुद्धा अनेकदा विचारलं गेलंय की 'तुम्हाला कविता कशी स्फुरते?' किंवा 'कथा तुम्हाला कशा सुचतात?' किंवा काही लोक असंही म्हणतात, 'बापरे! एवढ्या मोठ्या कादंबऱ्या तुम्ही कशा लिहिता?' कसं सुचतं हे कोणताही लेखक किंवा कवी सांगू शकत नाही. आपोआप शब्दांच्या ओळीच्या ओळी मनात उतरत असतात. सुचणं हा विचारांचा गाभा. ते सुचतांना आणि लिहिताना मुख्य घटक असतो शब्द. स्वेटरच्या किंवा शालीच्या विणीप्रमाणे शब्दांची वीण वेगवेगळी असते. शब्द शब्द गुंफल्यावर साहित्य निर्माण होतं. कोणकोणते शब्द कुठे बरे दिसतील ह्याची निवड लेखकाचं मन किंवा त्याची लेखनाची प्रवृत्ती करते. तसंच ते साहित्यप्रकारावरसुद्धा अवलंबून असतं. आणि लेखक किंवा कवीचं स्वत:चं जे शब्दभांडार असतं त्यावरही शब्दांची योजना अवलंबून असते. आणि ही प्रक्रिया अगदी नकळत घडते. त्यात मुद्दाम केलेल्या कारागिरीला मुळीच वाव नसतो. पण ही सहज प्रक्रिया शब्दांमधूनच तिचं अस्तित्व दाखविते. हेच खऱ्या कवीचं किंवा लेखकाचं यश. त्याला उत्तुंग शिखरावर पोहोचविणारी हीच ती शब्दांमधली जादूची किमया. एखाद्या अप्रतिम कवितेचं, कादंबरीचं, कोणत्याही ललित साहित्याचं त्यातील विचारांच्या सकस गाभ्याबरोबरच 'काय शब्द आहेत!' ह्या 'शब्दां'मध्येच कौतुक केलं जातं.

पण शब्द एकटेच नसतात. त्यांना अर्थाचं कोंदण नसेल तर शब्दाला महत्त्व नाही. जे विशिष्ट स्वरूपात बोललं किंवा लिहिलं जातं ते वाङ्मय किंवा साहित्य. पण फक्त शब्द म्हणजे साहित्य नव्हे. नाहीतर रस्त्यावरच्या किंवा दुकानांवर लावलेल्या नावाच्या पाट्या हेही साहित्य झालं असतं. बघा! रस्त्याला आणि दुकानांनाही 'नावं' असतात. आणि ती सार्थही असावी लागतात. रस्त्याचं एक बरंय! त्यांनी माणसांचीच नावं पटकावली आहेत. पण दुकानांच्या नावाना त्यांच्या अर्थामुळे औचित्य लाभतं. 'मेजवानी' किंवा 'आस्वाद' ही नावं हॉटेल, रेस्टॉरंटलाच शोभतात. पण औषधाच्या दुकानावर ही नावं शोभणार नाहीत. पुण्यातल्या बंगल्यांना फार सुंदर समर्पक नावं असतात. 'ये ना' हे बंगल्याचं नाव किती अगत्याचं आमंत्रण देणारं आहे ना? एका घराचं नाव आहे 'आतिथ्य'. तिथं आत न जाताच आत गेल्यावर एक प्रकारचा सुंदर जिव्हाळा अनुभवायला मिळेल असं वाटतं. 'पोटोबा' हे असंच एका हॉटेलचं नाव. ह्याचाच अर्थ शब्दाविना अर्थ नाही नी अर्थावाचून शब्द नाहीत. सुंदर हा शब्दच सुंदर वाटतो तर मिळमिळीत हा शब्दच सपक वाटतो. अलौकिक शब्दात देवाचा अंश जाणवतो तर सैतानी हा शब्द वाईट लोकांचे विचारच उघड करतो. म्हणूनच शब्द आणि अर्थ ह्यांची एकत्र गुंफणच विलोभनीय वाटते. जेव्हा एका शब्दाचे अनेक अर्थ नी एकाच अर्थाचे अनेक शब्द असतात तेव्हा त्या समग्र शब्दांचा आणि अर्थांचा समुदाय आपल्या मनात अलगद उतरतो.

आत्ताच बघा! 'नाव' ह्या एका शब्दावरून ह्या लेखाची गुंफण सुरू झाली आणि म्हणता म्हणता शब्दांचा हा एवढा फुलोरा आपोआप फुलत गेला. माझ्या एका कवितेत अगदी मोजक्या शब्दात व ओळीमध्ये हा फुलोरा वेगळ्या डौलानं फुललेला दिसतो. मी कधी कवयित्री होईन नी माझ्या कविता सर्व गाजलेल्या मासिकांमधून सतत प्रसिद्ध होत राहतील ह्याची मला माझी पहिली कविता सत्तरच्या दशकात मासिकाला पाठविल्यानंतर लगेच प्रसिद्ध होईपर्यंत कल्पनाही नव्हती. तीच कथा माझ्या लघुकथांची. माझ्या अनेक कविता आणि लघुकथा महिन्याला सहासहा मासिकांमधून प्रकाशित होत राहिल्या. यथावकाश कादंबऱ्याही पुस्तकरूपाने प्रकाशित होऊ लागल्या. माझी फॅनमेल ह्या वेळेपर्यंत खूपच वाढली. वाचकांच्या प्रत्येक पत्रात माझ्या साहित्यातील शब्दांबद्दल आणि शैलीबद्दल गौरवोद्गार येऊ लागले. विख्यात लेखिका कुमुदिनी रांगणेकर ह्यांनी त्यावेळी प्रकाशित झालेल्या माझ्या दोन कादंबऱ्यांना कौतुकाची पावती देणारी दोन पत्रं पाठविली. आता लोकांचे फोन येतात. 'तुम्ही हे कसं लिहिता?' हा त्यातला प्रमुख प्रश्न. आणि 'किती सुंदर शब्द वापरता' हे प्रमुख वाक्य असतं. ऐंशीच्या दशकात इतर मासिकांप्रमाणेच मी रोहिणी मासिकालाही कविता पाठवली होती. त्यांनी पाठवलेलं पत्र खूप बोलकं होतं. त्यांनी कळविलं होतं की, 'आम्ही कविता छापत नाही म्हणून तुमची कविता परत करणार होतो. पण परत पाठविण्याआधी वाचून बघितली आणि अतिशय आवडली. म्हणून नियमाला अपवाद करून आम्ही ही कविता छापत आहोत. कवितेतील विचार आणि शब्द खूपखूप आवडले.' मी हे एवढ्याचसाठी सांगतेय की ही सगळी माझ्या साहित्यातील शब्दांची किमया- अर्थातच 'अर्थपूर्ण प्रासादिक लालित्यपूर्ण शब्दांची' किमया.

ह्या साहित्याची मी लेखिका आणि कवयित्री. 'मी' म्हणजे 'सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर'. दुकानांमधल्या किंवा वाचनालयामधल्या माझ्या प्रकाशित

(पान ६ कॉलम ३ वर)

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

## प्रभुतरुणाची डायरी

### कुर्यात् बटोर्मंगलम्

| | |
|---|---|
| २१-५-१३ | अमोल किरण व्यवहारकर |
| २९-५-१३ | कुश साहिल रंजन देसाई, वांद्रे |
| ३०-५-१३ | वरूण राकेश राणे, झावबावाडी |
| ३०-५-१३ | सुधांशु मिलिंद अजित नवलकर, खार |

### नांदा सौख्यभरे

| | | |
|---|---|---|
| २५-५-१३ | श्री. अन्वय रंजन देसाई | कु. निवेदिता नीलेश विठोबा नायक |
| २८-५-१३ | कु. नंदिता विवेक यशवंतराव व्यवहारकर | श्री. शैलेंद्र मोहन जयस्वाल (आं.ज्ञा.) |
| ०२-६-१३ | श्री. राहुल किरण आगासकर | कु. यशाली दीपक नवलकर |

### विवाह सुवर्ण-महोत्सव

| | | |
|---|---|---|
| ११-५-१३ | श्री. विनयशील खंडेराव देसाई | कु. रजनी मनोहर तळपदे |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०२-५-१३ | श्री. जयवंत मोतीराम नायक | वय ७९ | विलेपार्ले |
| १९-५-१३ | श्रीमती मंगला मनोहर त्रिलोकेकर | वय ८० | ठाकुरद्वार |
| २६-५-१३ | श्री. तुषार रवींद्र दळवी | वय ६६ | सेक्रेमेण्टो-युएसए |
| ०१-६-१३ | श्रीमती लता रामराव देसाई | वय ८७ | दादर (प.) |

## प्रभुतरुणास देणगी

❁ सौ. शर्मिला आणि किरण सुरेंद्र व्यवहारकरकडून अमोलचा व्रतबंध झाल्याप्रीत्यर्थ रु. ५००/-

*

## परीक्षेतील सुयश

**आयसीएससी**

श्री. आकाश आशुतोष नवलकर

**(दहावी) एसएससी**

श्री. शौनक कौशिक जयकर

८५.२३ टक्के

**मास्टर ऑफ सायन्स**

**प्रोजेक्ट मॅनेजमेंट (बोस्टन युनिव्हर्सिटी यु.एस.ए.)**

सौ अश्विना कार्तिक कीर्तिकर

**सीबीएससी**

कु. क्षिती रवींद्र देसाई ९१ टक्के

*

## अभिनंदन

❁ हिंदू महासभेचे ज्येष्ठ नेते विक्रम सावरकर यांच्या जीवनावर प्रताप वेलकर यांनी लिहिलेल्या 'महावीर भासे' या ग्रंथाचे प्रकाशन नुकतेच दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक सभागृहात स्मारकाचे अध्यक्ष डॉ. अरुण जोशी यांच्या हस्ते झाले. लेखक श्री. प्रताप वेलकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अभिनंदन.

❁ दिनांक १६ मे रोजी 'वलय प्रतिष्ठान'चा वर्धापन दिन खार येथील सांस्कृतिक सभागृहात साजरा झाला. सौ. पूजा अमर अजिंक्य यांच्या नेतृत्वाखाली पाठारे प्रभू कलाकारांना भविष्यवेधी वाव देणाऱ्या 'वलय'च्या वर्षभरातील दोन कार्यक्रमांची पडद्यावर झलक दाखविण्यात आली. एकाच दिवशी दोन प्रयोग केलेलं नाटक आणि पाठारे प्रभू आयडॉल यांची झलक पहाताना आनंदाचे भरते आले. 'आयडॉल'मधील विजेत्यांनी गीते सादर केली. नाट्यसंहितेसाठी सादर झालेल्या स्पर्धेचा निकाल त्यानंतर जाहीर झाला. प्रथम क्रमांक लागला सौ. केतकी राजन जयकर यांचा. द्वितीय क्रमांक सौ. ईना तळपदे यांनी पटकावला; तर डॉ. सुमन नवलकरांच्या संहितेला तृतीय क्रमांकाचा सन्मान लाभला. परीक्षण श्री. देवेंद्र पेम यांनी केले होते. नाट्यसंहितेवरून प्रयोग सिद्ध करून 'वलय प्रतिष्ठान' महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेत उतरणार आहे. मन:पूर्वक शुभेच्छा. स्पर्धेतील सहभागी सर्व मान्यवरांना सन्मानचिन्ह देण्यात आले. श्री. अमर अजिंक्य यांनी हे चिन्ह तयार करून घेतले होते. वलयांकीत अशा या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. 'वलय'ला शुभेच्छा.

❁ श्री. महेश कोठारे यांचा झपाटलेला-२ हा चित्रपट मराठीतील पहिला श्रीडी चित्रपट आहे. या महिन्यात दाखल झालेल्या या चित्रपटात आदिनाथ कोठारेंची प्रमुख भूमिका आहे. अभिनंदन 'कोठारे आणि कोठारे व्हिजन'चं. 'को.हो. मराठी करोडपती'मध्ये या निमित्ताने महेश कोठारेंचा सहभाग होता. त्यात मिळालेली एक लाख काही हजारांची रक्कम त्यांनी 'आदीपथ' या संस्थेला दान केली. छान!

❁ 'तुझं माझं जमेना' या मालिकेचं कलादिग्दर्शन श्री. अभिषेक विजयकरांचं आहे. अभिनंदन.

*

(पान ५ कॉलम ४ वरून)

कादंबऱ्यांवरचं नाव वाचून माझ्या मिस्टरांना 'तुमची बायको लेखिका आहे?' हा कौतुकभरला प्रश्न विचारला जातो. असाच प्रश्न मुलाला विचारला जातो- 'तुझी आई लेखिका आहे?' आणि उज्ज्वल ब्रह्मांडकर म्हणजे 'स्वप्नीलची आई' हे त्याचे मित्र मनात ठसवतात किंवा मिस्टरांना ओळखणारे लोक 'उज्ज्वल ब्रह्मांडकर म्हणजे रवींद्र ब्रह्मांडकरांची बायको बरं का!' ही ओळख मनात बाळगतात. हे माझ्या साहित्याचं नाव आणि हाच माझ्या साहित्याला लाभलेला चेहरा.

हाच तो नावाचा महिमा.

## पाठारे प्रभु चॅरिटीझ

दिनांक २ जून रोजी चॅरिटीझचे अध्यक्ष श्री. उदय शंकर मानकर यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली. श्री. नरेश मानकर, श्री. सुभाष राव, श्री. अशोक तळपदे, प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांनी या सभेत काही मुद्दे मांडून उपस्थितांचे प्रतिनिधीत्व केले. या मुद्यांबद्दल श्री. वीरपाल राणे यांनी चॅरिटीझच्यावतीने यथोचित खुलासे करून संस्थेची कार्यपद्धती व भूमिका स्पष्ट केली. वार्षिक अहवालाला सभेची शंभर टक्के मान्यता लाभली. सभा दरवर्षीप्रमाणे सुरळीत पार पडली.

**MAHABALESHWAR**

COME HERE TO EXPERIENCE NATURE AT ITS BEST WITH JASMINE COTTAGE

THE COTTAGE OFFERS 4 SPACIOUS ROOMS . IT PROVIDES ACCOMODATION FACILITIES TO SUIT THE BUDGET OF THE TOURIST
ALL THE ROOMS HAVE SERENE ENVIRONMENT AND OPEN SIT-OUT VARANDA WHERE GUESTS CAN SIT AND ENJOY THE PLEASANT BEAUTY OF THE NATURE

**FACILITIES:**

* Attached bath
* Hot & Cold Running water
* Television with Satellite Connection
* Car Parking
* Large open area for playing outdoor games

**Location:**

It is located near the market in Mahabaleshwar within close proximity of bus stand in the gorgeous land of Mahabaleshwar.

**For Booking Contact:**
Velkars 9930172689 9220451465

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67